भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# गुरे अतिक्रमण अधिनियम, १८७१

## (१८७१ चा अधिनियम क्रमांक १)

[दिनांक १५ डिसेंबर १९९३ रोजी यथाविद्यमान]

# The Cattle-Trespass Act, 1871

## (Act No. 1 of 1871)

[*As in force on the 15th December 1993*]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
(१९९५)

[किंमत : रु. २.४०]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १५ डिसेंबर १९९३ रोजी यथाविद्यमान असलेला कॅटल ट्रेसपास ॲक्ट, १८७१ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ५ अंक १, दिनांक २३ जून १९९४ यात पृष्ठे १२ ते १७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २३ जून १९९४.

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Cattle Trespass Act, 1871 as on the 15th December 1993 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 5, dated 23rd June, 1994 on pages 12 to 17

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the
Government of India.

New Delhi,
Dated 23rd June 1994.

# गुरे अतिक्रमण अधिनियम, १८७१

## कलमांचा क्रम

कलमे


### प्रकरण १ ले
### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव व विस्तार.
२. [निरसित].
३. निर्वचन खंड.

### प्रकरण २ रे
### कोंडवाडे व कोंडवाडा रक्षक

४. कोंडवाडे स्थापन करणे.
५. कोंडवाड्यांचे नियंत्रण.
कोंडवाड्यात अडकवलेल्या गुराढोरांना चारापाणी देण्यासंबंधीच्या शुल्काचे दर.
६. कोंडवाडा रक्षकाची नियुक्ती.
कोंडवाडा रक्षक अन्य पदे धारण करू शकतील.
कोंडवाडा रक्षक हे लोकसेवक असणे.

कोंडवाडा रक्षकाची कर्तव्ये

७. नोंदवह्या ठेवणे व प्रतिवेदने सादर करणे.
८. गुराढोरांना पकडल्यासंबंधीची नोंद करणे.
९. गुराढोरांचा ताबा घेणे व त्यांना चारापाणी देणे.

### प्रकरण ३ रे
### गुराढोरांना कोंडवाड्यात टाकणे

१०. जमिनीचे नुकसान करणारी गुरेढोरे.
गुराढोरांना पकडण्याच्या कामी पोलिसांनी साहाय्य करणे.
११. सार्वजनिक रस्ते, कालवे व बंधारे यांचे नुकसान करणारी गुरेढोरे.
१२. कोंडवाड्यात टाकलेल्या गुराढोरांबद्दल द्रव्यदंड.
द्रव्यदंडाची व चारापाण्याच्या शुल्कांची यादी.

### प्रकरण ४ थे
### गुराढोरांची सुपूर्दगी किंवा विक्री

१३. जेव्हा मालक गुराढोरांची मागणी करील आणि द्रव्यदंड व शुल्क देईल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.
१४. गुराढोरांची एक आठवड्यात मागणी न झाल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती.
१५. गुराढोरांच्या धरपकडीच्या वैधतेसंबंधी वाद उपस्थित करणाऱ्या मालकाने, अनामत रक्कम ठेवल्यावर गुरेढोरे त्याच्याकडे सुपूर्द करणे.
१६. मालक द्रव्यदंड व खर्च देण्यास नकार देईल किंवा त्या कामी कसूर करील तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.
द्रव्यदंड व खर्च वळते करणे.
विक्री न झालेली गुरेढोरे व उत्पन्नातील शिल्लक सुपूर्द करणे.
पोचपावती.
१७. द्रव्यदंड, खर्चाची रक्कम व विक्रीचे जादा उत्पन्न यांचा विनियोग
१८. [निरसित].
१९. अधिकाऱ्यांनी व कोंडवाडा रक्षकांनी या अधिनियमाखालील विक्रीच्या वेळी गुराढोरांची खरेदी करावयाची नाही.
कोंडवाड्यात टाकलेली गुरेढोरे कोंडवाडा रक्षकांनी केव्हा सोडून द्यावयाची नाहीत.


एष ४२२७—२ (१०२१—११-९४)

कलमे

## प्रकरण ५ वे

**गैरपणे धरपकड केल्याबद्दल किंवा अडकवून ठेवल्याबद्दल तक्रारी**

२०. तक्रारी करण्याच्या शक्ती.

२१. तक्रार आल्यावर अनुसरावयाची कार्यपद्धती.

२२. अवैधपणे धरपकड केल्याबद्दल किंवा अडकवून ठेवल्याबद्दल भरपाई. गुराढोरांची सुटका.

२३. भरपाईची वसुली.

## प्रकरण ६ वे

**शिक्षा**

२४. गुराढोरांच्या धरपकडीस जबरदस्तीने विरोध करण्याबद्दल किंवा त्यांना गैरपणे सोडवून घेण्याबद्दल शिक्षा.

२५. गुराढोरांना अतिक्रमण करावयास लावून आगळीक केल्याबद्दल द्रव्यदंड वसूल करणे.

२६. डुकरांनी जमीन किंवा पिके किंवा सार्वजनिक रस्ते यांचे नुकसान केल्याबद्दल द्रव्यदंड.

२७. कर्तव्ये करण्यात कसूर करणाऱ्या कोंडवाडा रक्षकास दंड.

२८. कलम २५, २६ किंवा २७ खाली वसूल केलेल्या द्रव्यदंडाचे उपयोजन.

## प्रकरण ७ वे

**भरपाईसाठी दावे**

२९. भरपाईसाठी दावा लावण्याच्या अधिकाराची व्याप्ती.

३०. वजावट.

## प्रकरण ८ वे

**पूरक**

३१. विवक्षित कार्याधिकार स्थानिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याचा व आदा जमा रकमा स्थानिक निधीत जमा करण्याचा निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

अनुसूची [निरसित].

# गुरे अतिक्रमण अधिनियम, १८७१

## (सन १८७१ चा अधिनियम क्रमांक १)[१]

[१५ डिसेंबर १९९२ रोजी यथाविद्यमान] [१३ जानेवारी १८७१]

**गुराढोरांकडून होणाऱ्या अतिक्रमणासंबंधीचा कायदा एकत्रित व विशोधित करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, गुराढोरांकडून होणाऱ्या अतिक्रमणासंबंधीचा कायदा एकत्रित व विशोधित करणे समयोचित आहे ;

त्याअर्थी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

### प्रकरण १ ले

### प्रारंभिक

[२][ १. (१) या अधिनियमास गुरे अतिक्रमण अधिनियम, १८७१, असे म्हणता येईल ; व **संक्षिप्त नाव व विस्तार.**

(२) [३][दिनांक १ नोव्हेंबर १९५६ च्या लगतपूर्वी जी राज्यक्षेत्रे भाग ख राज्यांमध्ये समाविष्ट होती ती राज्यक्षेत्रे] आणि इलाखा शहरे व राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी या अधिनियमांच्या प्रवर्तनातून वगळील अशी स्थानिक क्षेत्रे खेरीजकरून, संपूर्ण भारतभर या अधिनियमाचा विस्तार राहील.

[४][ * * * * * * * ]]

२. [अधिनियमांचे निरसन—निरसित अधिनियमांचे निर्देश.] निरसन अधिनियम, १९३८, (१९३८ चा १) याद्वारे निरसित.

३. या अधिनियमात— **निर्वचन खंड.**

"पोलीस अधिकारी" या शब्दप्रयोगात, गावाचा चौकीदार व "गुरेढोरे" या शब्दप्रयोगात, हत्ती, ऊंट, रेडे, म्हशी, घोडे, घोड्या, खच्ची केलेली जनावरे, तट्टू, शिंगरू, तट्टाण्या, खेचरे, गाढवे, डुकरे, एडके, मेष, मेंढे, कोकरे व बकरे आणि त्यांची पिले यांचा समावेश आहे ; [५][आणि]

[६]["स्थानिक प्राधिकरण" याचा अर्थ, विनिर्दिष्ट स्थानिक क्षेत्रातील कोणत्याही गोष्टीचे नियंत्रण व प्रशासन करण्याचा अधिकार कायद्याने ज्याच्या ठायी विनिहित केला असेल असा कोणताही व्यक्तिनिकाय, असा आहे, व

"स्थानिक निधी" याचा अर्थ, स्थानिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील व व्यवस्थापनाखालील कोणताही निधी, असा आहे. ]

---

१. हा अधिनियम पुढील ठिकाणी लागू करताना पुढीलप्रमाणे त्या त्या अधिनियमाद्वारे विशोधित करण्यात आला आहे. :—

अजमीर.—१९५४ चा अजमीर अधिनियम ५.

आसाम.—१९३६ चा आसाम अधिनियम १.

मुंबई.—मुंबई अधिनियम, १९२४ चा ९, १९२६ चा ४ आणि १९३१ चा ५.

मध्यप्रदेश.—मध्यप्रांत अधिनियम, १९३५ चा १२, १९३७ चा २२ आणि १९४८ चा मध्यप्रांत आणि वऱ्हाड अधिनियम २७.

ओरिसा.—ओरिसा अधिनियम, १९४८ चा १५ आणि १९५० चा २३.

पंजाब.—१९५२ चा पंजाब अधिनियम २४.

संबळपूर जिल्हा.—ओरिसा अधिनियम, १९३९ चा ६.

उत्तर प्रदेश.—उत्तर प्रदेश अधिनियम, १९५४ चा ७.

पश्चिम बंगाल.—१९३४ चा बंगाल अधिनियम ५ आणि १९४७ चा बंगाल अधिनियम १४ आणि १९४८ चा बंगाल अधिनियम ७ द्वारे अंशतः निरसित.

२. १८९१ चा अधिनियम १, कलम १ द्वारे मूळ कलम १ ऐवजी दाखल करण्यात आले.

३. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश १९५६, द्वारे "भाग ख राज्ये" याऐवजी दाखल करण्यात आले.

४. १९१४ चा अधिनियम १०, कलम ३ आणि अनुसूची दोन यांद्वारे पोटकलम करण्यात आले.

५. १८९१ चा अधिनियम १, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

६. १४ जानेवारी १८८७, नंतर संमत झालेल्या सर्व अधिनियमांना लागू असणारा सर्वसाधारण खंड अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०), याच्या कलम ३(२८) मधील व्याख्या ताडून पहा.

## प्रकरण २ रे

### कोंडवाडे व कोंडवाडा रक्षक

*कोंडवाडे स्थापन करणे.*

४. राज्य शासनाच्या सर्वसाधारण नियंत्रणाच्या अधीनतेने, जिल्हा दंडाधिकारी वेळोवेळी निदेशित करील अशा जागी कोंडवाडे स्थापन करण्यात येतील.

प्रत्येक कोंडवाड्याचा उपयोग कोणत्या गावाने करावा ते जिल्हा दंडाधिकारी ठरवील.

*कोंडवाड्यांचे नियंत्रण. कोंडवाड्यात अडकवलेल्या गुराढोरांना चारापाणी देण्यासंबंधीच्या शुल्काचे दर.*

५. कोंडवाडे जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली असतील व कोंडवाड्यात अडकवून ठेवलेल्या गुराढोरांना चारापाणी देण्यासंबंधीच्या शुल्काचे दर तो निर्धारित करील व तो त्यात वेळोवेळी बदल करू शकेल.

*कोंडवाडा रक्षकाची नियुक्ती.*

[1][६. राज्य शासन प्रत्येक कोंडवाड्यासाठी एकेका कोंडवाडा रक्षकाची नियुक्ती करील.

*कोंडवाडा रक्षक अन्य पदे धारण करू शकतील.*

कोणत्याही व्यक्तीला, ती कोंडवाडा रक्षक असताना त्याच वेळी शासनाच्या अखत्याराखालील अन्य कोणतेही पद धारण करता येईल.

*कोंडवाडा रक्षक हे लोकसेवक असणे.*

प्रत्येक कोंडवाडा रक्षक हा भारतीय दंड संहिता यात अभिप्रेत असल्याप्रमाणे लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.] १८६० चा ४५

### कोंडवाडा रक्षकाची कर्तव्ये

*नोंदवह्या ठेवणे व प्रतिवेदने सादर करणे.*

७. प्रत्येक कोंडवाडा रक्षकाला राज्य शासन वेळोवेळी निदेशित करील अशा नोंदवह्या ठेवाव्या लागतील व अशी प्रतिवेदने सादर करावी लागतील.

*गुराढोरांना पकडल्यासंबंधीची नोंद करणे.*

८. गुरेढोरे कोंडवाड्यात आणल्यानंतर, कोंडवाडा रक्षक आपल्या नोंदवहीत पुढील गोष्टींची नोंद करील, त्या अशा :—

(क) गुराढोरांची संख्या व वर्णन,
(ख) त्यांना तसे पकडून आणल्याचा दिवस व वेळ,
(ग) गुरेढोरे पकडून आणणाऱ्याचे नाव व पत्ता, व
(घ) माहीत असल्यास मालकाचे नाव व पत्ता,

आणि त्या नोंदीची एक प्रत गुरेढोरे पकडून आणणाऱ्यास किंवा त्याच्या अभिकर्त्यास देईल.

*गुराढोरांचा ताबा घेणे व त्यांना चारापाणी देणे.*

९. यात यापुढे निदेशित केल्याप्रमाणे गुराढोरांची विल्हेवाट लावली जाईपर्यंत, कोंडवाडा रक्षक हा त्यांचा ताबा घेईल व त्यांना चारापाणी देईल.

## प्रकरण ३ रे

### गुराढोरांना कोंडवाड्यात टाकणे

*जमिनीचे नुकसान करणारी गुरेढोरे.*

१०. कोणतीही जमीन कसणारा किंवा तिचा वहिवाटदार, किंवा कोणत्याही जमिनीवर पीक लावण्यासाठी किंवा त्याच्या उत्पादनासाठी ज्या व्यक्तीने आगाऊ पैसे दिले आहेत ती व्यक्ती किंवा अशा पिकाचा किंवा उत्पादनाचा किंवा त्याच्या कोणत्याही अंशाचा खरेदीदार किंवा गहाणधारक अशा जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्या व तिचे किंवा तीवरील कोणत्याही पिकाचे किंवा उत्पादनाचे नुकसान करणाऱ्या कोणत्याही गुराढोरांना स्वतः पकडू शकेल किंवा दुसऱ्याकरवी पकडू शकेल आणि ती जमीन ज्या गावात असेल त्या गावातील कोंडवाड्यात [2][चोवीस तासांच्या आत स्वतः पाठवू शकेल किंवा दुसऱ्याकरवी पाठवू शकेल.]

*गुराढोरांना पकडण्याच्या कामी पोलिसांनी सहाय्य करणे.*

(क) अशा प्रकारे गुरेढोरे पकडली जात असता त्याचा प्रतिकार केला जाऊ नये,
(ख) अशा प्रकारे पकडणाऱ्या व्यक्तीकडून ती गैरपणे सोडवून घेतली जाऊ नयेत,

यासाठी सर्व पोलीस अधिकारी, तशी मागणी होईल तेव्हा, सहाय्य करतील.

---

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे दाखल करण्यात आले.

२. १८९१ चा अधिनियम १, कलम ३ द्वारे "अनावश्यक विलंब न करता स्वतः पाठवू शकेल किंवा दुसऱ्याकरवी पाठवू शकेल" याऐवजी दाखल करण्यात आले.

**सार्वजनिक रस्ते, कालवे व बंधारे यांचे नुकसान करणारी गुरेढोरे.**

[1]११. सार्वजनिक रस्ते, विहारस्थळे, मळे, कालवे, पाणीनिचऱ्याची बांधकामे, बंधारे व तत्सम बांधकामे यांची व्यवस्था ज्यांच्याकडे आहे अशा व्यक्ती व पोलीस अधिकारी, असे रस्ते, विहारस्थळे, मळे, कालवे, पाणीनिचऱ्याची बांधकामे किंवा बंधारे यांच्या बाजूंचे किंवा उतारांचे नुकसान करणाऱ्या किंवा त्यांवर भटकताना आढळलेल्या गुराढोरांना पकडू शकतील किंवा दुसऱ्याकरवी पकडू शकतील ;

व त्यांना [2][चोवीस तासांच्या आत सर्वात जवळच्या कोंडवाड्यात स्वतः पाठवतील किंवा दुसऱ्या-करवी पाठवतील.]

**कोंडवाड्यात टाकलेल्या गुराढोरांबद्दल द्रव्यदंड.**

[3][१२. कोंडवाडा रक्षक हा राज्य शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे यासंबंधात त्या त्या काळी विहित केलेल्या दराने उपरोक्तप्रमाणे कोंडवाड्यात टाकलेल्या गुराढोरांबद्दल दरडोई द्रव्यदंड बसवील. निरनिराळ्या स्थानिक क्षेत्रांसाठी निरनिराळे दर विहित करता येतील.

याप्रमाणे वसूल केलेले सर्व द्रव्यदंड राज्य शासन निदेशित करील अशा अधिकाऱ्यामार्फत जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात येतील.

**द्रव्यदंडाची व चारापाण्याच्या शुल्कांची यादी.**

द्रव्यदंड व गुराढोरांच्या चारापाण्याच्या शुल्काचे दर यांची यादी प्रत्येक कोंडवाड्यावर किंवा त्याच्या जवळपास ठळक जागी लावण्यात येईल.]

## प्रकरण ४ थे

### गुराढोरांची सुपूर्दगी किंवा विक्री

**जेव्हा मालक गुराढोरांची मागणी करील आणि द्रव्यदंड व शुल्क देईल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.**

१३. कोंडवाड्यात टाकलेल्या गुराढोरांच्या मालकाने किंवा त्याच्या अभिकर्त्याने हजर होऊन गुराढोरांची मागणी केली तर, त्याने अशा गुराढोरांसंबंधी झालेला द्रव्यदंड व कोंडवाडा रक्षकाला आलेला खर्च दिल्यानंतर कोंडवाडा रक्षक ती गुरेढोरे त्याच्या स्वाधीन करील.

गुरेढोरे परत ताब्यात घेतल्यावर, मालकाला किंवा त्याच्या अभिकर्त्याला कोंडवाडा रक्षकाने ठेवलेल्या नोंदवहीत ती पोचल्याबद्दलची सही करावी लागेल.

**गुराढोरांची एक आठवड्यात मागणी न झाल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती.**

१४. गुराढोरांना कोंडवाड्यात टाकल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत त्यांची मागणी न झाल्यास, कोंडवाडा रक्षक सर्वात जवळच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला किंवा जिल्हा दंडाधिकारी यासंबंधात नियुक्त करील अशा अन्य अधिकाऱ्याला ते वृत्त कळवील.

त्यानंतर असा अधिकारी पुढील गोष्टी नमूद करणारी एक नोटीस त्याच्या कार्यालयातील ठळक ठिकाणी चिकटवील, त्या अशा :—

(क) गुराढोरांची संख्या व वर्णन,

(ख) त्यांना जेथे पकडले ती जागा,

(ग) त्यांना ज्या कोंडवाड्यात टाकले ती जागा.

आणि त्यांना जेथे पकडण्यात आले त्या गावात व तेथून सर्वात जवळच्या बाजाराच्या ठिकाणी दवंडी पिटवून ते जाहीर करवील.

त्या नोटिशीच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत गुराढोरांची मागणी केली गेली नाही तर, उक्त अधिकाऱ्यामार्फत किंवा त्याच्या आस्थापनेतील त्या प्रयोजनार्थ प्रतिनियुक्त केलेल्या अधिकाऱ्यामार्फत ती गुरेढोरे जिल्हा दंडाधिकारी वेळोवेळी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेशित करील अशा जागी व अशा वेळी व अशा शर्तींच्या अधीनतेने जाहीर लिलावाने विकण्यात येतील :

परंतु, जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या मते उपरोक्तप्रमाणे विक्री केल्यास अशा गुराढोरांना रास्त किंमत येणार नसेल तर, त्याला योग्य वाटेल अशा रीतीने त्यांची विल्हेवाट करता येईल.

[illegible]

---

१. कलम ११ वनांना प्रयुक्त करताना भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १७), कलम ७० पहा ; रेल्वेस प्रयुक्त करताना भारतीय रेल्वे अधिनियम, १८९० (१८९० चा ९), कलम १२५(४) पहा.

२. १८९१ चा अधिनियम, १, कलम ४ द्वारे "अनावश्यक विलंब न करता त्यांना जवळच्या कोंडवाड्यात घेऊन जाईल" याऐवजी दाखल करण्यात आले.

३. १९२१ चा अधिनियम, १७, कलम २ द्वारे मूळ कलम १२ ऐवजी दाखल करण्यात आले, भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १७), कलम ७१ पहा. या अधिनियमान्वये राज्य शासन या अधिनियमाच्या कलम ७० अन्वये कोंडवाड्यात टाकलेल्या गुराढोरांबद्दलच्या द्रव्यदंडाचे निरनिराळे दर विहित करू शकेल.

**गुराढोरांच्या धरपकडीच्या वैधतेसंबंधी वाद उपस्थित करणाऱ्या मालकाने अनामत रक्कम ठेवल्यावर गुरेढोरे त्याच्याकडे सुपूर्द करणे.**

१५. मालक किंवा त्याचा अभिकर्ता हजर झाला व ती धरपकड अवैध असून कलम २० खाली तक्रार करण्याचा मालकाचा विचार आहे असे कारण सांगून त्याने द्रव्यदंड व खर्च भरण्यास नकार दिला तर, द्रव्यदंड व गुराढोरांसंबंधी आलेला खर्च एवढी रक्कम त्याने अनामत ठेवल्यानंतर, ती गुरेढोरे त्याच्याकडे सुपूर्द करण्यात येतील.

**मालक द्रव्यदंड व खर्च देण्यास नकार देईल किंवा त्या कामी कसूर करील तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.**

१६. मालक किंवा त्याचा अभिकर्ता हजर झाला आणि उक्त द्रव्यदंड व खर्च भरण्यास अथवा (कलम १५ मध्ये उल्लेखिलेल्या प्रकरणी) तेवढी रक्कम अनामत ठेवण्यास त्याने नकार दिला किंवा त्या कामी कसूर केली तर, ती गुरेढोरे किंवा त्यांच्यापैकी आवश्यक असतील तेवढी गुरेढोरे कलम १४ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अशा अधिकाऱ्यांमार्फत, अशा जागी व वेळी आणि अशा शर्तींच्या अधीनतेने जाहीर लिलावाने विकण्यात येतील.

**द्रव्यदंड व खर्च वळते करणे.**

वसुलीयोग्य द्रव्यदंड व चारापाण्याचा खर्च विक्रीच्या उत्पन्नातून, विक्रीचा काही खर्च असल्यास त्यासह वळता करण्यात येईल.

**विक्री न झालेली गुरेढोरे व उत्पन्नातील शिल्लक सुपूर्द करणे.**

राहिलेली गुरेढोरे व विक्रीच्या उत्पन्नापैकी काही शिल्लक असल्यास ती शिल्लक मालकाला किंवा त्याच्या अभिकर्त्याला खालील हिशेबासह देण्यात येईल :—

(क) पकडलेल्या गुराढोरांची संख्या,

(ख) त्यांना जितका काळ कोंडवाड्यात टाकण्यात आले होते तो कालावधी,

(ग) द्रव्यदंडाची व आलेल्या खर्चाची रक्कम,

(घ) विकलेल्या गुराढोरांची संख्या,

(ङ) विक्रीचे उत्पन्न, व

(च) कशा रीतीने त्या उत्पन्नाचा विनियोग करण्यात आला ते.

**पोचपावती.**

मालकाला किंवा त्याच्या अभिकर्त्याला अशा हिशेबानुसार त्याच्याकडे सुपूर्द करण्यात आलेली गुरेढोरे व विक्रीच्या उत्पन्नापैकी शिल्लक रक्कम (काही असल्यास) यांबद्दल पोचपावती द्यावी लागेल.

**द्रव्यदंड, खर्चाची रक्कम व विक्रीचे जादा उत्पन्न यांचा विनियोग.**

१७. ज्याने विक्री केली तो अधिकारी अशी वळती करून घेतलेली द्रव्यदंडाची रक्कम जिल्हा दंडाधिकाऱ्याकडे पाठवील.

कलम १६ खाली वळता करून घेतलेला चारापाण्याचा खर्च कोंडवाडा रक्षकाकडे देण्यात येईल व तो देखील स्वतःला मिळालेल्या सर्व रकमा आपल्याकडे ठेवून, कलम १३ खालील अशा खर्चापोटी विनियोजित करील.

गुराढोरांच्या विक्रीच्या उत्पन्नापैकी मागणी करण्यात न आलेली जादा रक्कम जिल्हा दंडाधिकाऱ्याकडे पाठवण्यात येईल व तो ते उत्पन्न तीन महिन्यांपर्यंत ठेव म्हणून ठेवील व त्या कालावधीत त्यावर कोणीही दावा सांगून तो सिद्ध केला नाही तर, त्या कालावधीच्या समाप्तीनंतर [1][त्याने ती रक्कम राज्याच्या महसुलाचा भाग म्हणून वाळगली असल्याचे मानण्यात येईल.]

१८. [द्रव्यदंड व विक्रीचे मागणी न केलेले उत्पन्न यांचे उपयोजन] अनुकूलन आदेश, १९३७, द्वारे निरसित.

**अधिकाऱ्यांनी व कोंडवाडा रक्षकानी या अधिनियमाखालील विक्रीच्यावेळी गुराढोरांची खरेदी करावयाची नाही.**

१९. यात अंतर्भूत असलेल्या उपबंधाखाली नियुक्त केलेला कोणताही पोलीस अधिकारी, किंवा अन्य अधिकारी किंवा कोंडवाडा रक्षक याला या अधिनियमाखालील विक्रीच्या वेळी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणतीही गुरेढोरे खरेदी करता येणार नाहीत.

**कोंडवाड्यात टाकलेली गुरेढोरे कोंडवाडा रक्षकांनी केव्हा सोडून द्यावयाची नाहीत.**

कोंडवाड्यात टाकलेल्या कोणत्याही गुराढोरांना सोडून देण्याविषयी किंवा ती स्वाधीन करून देण्याविषयी एखाद्या दंडाधिकाऱ्याने किंवा दिवाणी न्यायालयाने आदेश दिला नसेल, तर कोणत्याही कोंडवाडा रक्षकास या प्रकरणाच्या पूर्ववर्ती भागातील उपबंधानुसार असेल त्याव्यतिरिक्त अन्यथा अशी गुरेढोरे सोडून देता येणार नाहीत किंवा ती स्वाधीन करून देता येणार नाहीत.

---

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे, "यात यापुढे उपबंधित केल्याप्रमाणे त्याचा विनियोग करील" याऐवजी दाखल करण्यात आले.

[1][प्रकरण ५ वे

## गैरपणे धरपकड केल्याबद्दल किंवा अडकवून ठेवल्याबद्दल तक्रारी

**तक्रारी करण्याच्या शक्ती.**

२०. या अधिनियमाखाली ज्या व्यक्तीची गुरेढोरे पकडण्यात आली आहेत किंवा अशाप्रकारे पकडण्यात आल्यावर या अधिनियमाचे उल्लंघन करून ती अडकवून ठेवण्यात आली आहेत अशा कोणत्याही व्यक्तीला, गुरेढोरे पकडण्यात आल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे, किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या मध्यस्थीशिवाय दोषारोपपत्रे स्वीकारण्यास व त्यांची संपरीक्षा करण्यास प्राधिकृत केलेल्या कोणत्याही दंडाधिकाऱ्याकडे तक्रार करता येईल.

**तक्रार आल्यावर अनुसरावयाची कार्यपद्धती.**

२१. तक्रारदाराला स्वत: किंवा परिस्थितीची व्यक्तिश: माहिती असलेल्या अभिकर्त्याला तक्रार करावी लागेल. तक्रार लेखी किंवा तोंडी असू शकेल. ती जर तोंडी असेल तर दंडाधिकारी तिचा सारांश लेखी उतरून घेईल.

तक्रारदाराची किंवा त्याच्या अभिकर्त्याची साक्ष-तपासणी केल्यानंतर दंडाधिकाऱ्याला तक्रार सबळ कारणावर आधारलेली आहे असे मानण्यास जागा आहे असे वाटले तर, जिच्याविरुद्ध तक्रार केलेली असेल त्या व्यक्तीला तो बोलावील व त्या प्रकरणाची चौकशी करील.

**अवैधपणे धरपकड केल्याबद्दल किंवा अडकवून ठेवल्याबद्दल भरपाई.**

२२. जर धरपकड करणे किंवा अडकवणे हे अवैध असल्याचे न्यायनिर्णीत झाले तर, दंडाधिकारी गुरेढोरे पकडण्यामुळे किंवा अडकवून ठेवण्यामुळे झालेल्या हानीबद्दल तक्रारदाराला जास्तीत जास्त शंभर रुपयांपर्यन्त भरपाई देववील आणि गुराढोरांची सुटका करवून घेताना तक्रारदाराला भरावे लागलेले सर्व द्रव्यदंड व त्याला आलेला खर्च यासह ती भरपाई, ज्या व्यक्तीने गुरेढोरे पकडली किंवा अडकवून ठेवली त्या व्यक्तीकडून देववण्यात येईल,

**गुराढोरांची सुटका.**

व गुराढोरांची सुटका केलेली नसेल तर, दंडाधिकारी अशा भरपाई देववण्याच्या आदेशाव्यतिरिक्त आणखी, त्यांची सुटका करण्याचा आदेश देईल व ज्या व्यक्तीने गुराढोरांना पकडले किंवा अडकवले तिने या अधिनियमाखाली वसुलीयोग्य असलेला द्रव्यदंड व खर्च द्यावा, असा निदेश देईल.

**भरपाईची वसुली.**

२३. कलम २२ मध्ये नमूद केलेली भरपाई, द्रव्यदंड व खर्च म्हणजे जणू काही दंडाधिकाऱ्याने बसवलेले द्रव्यदंड असावेत असे समजून त्याप्रमाणे तो वसूल करता येईल.]*

# प्रकरण ६ वे

## शिक्षा

**गुराढोरांच्या धरपकडीस जबरदस्तीने विरोध करण्याबद्दल किंवा त्यांना गैरपणे सोडवून घेण्याबद्दल शिक्षा.**

२४. या अधिनियमाखाली धरपकड होण्यास पात्र असलेल्या गुराढोरांना पकडण्यास जो कोणीही जबरदस्तीने विरोध करील,

व गुराढोरांना पकडण्यात आल्यानंतर जो कोणी कोंडवाड्यातून, अथवा अगदी जवळपास असलेली जी व्यक्ती, या अधिनियमाद्वारे प्रदान केलेल्या शक्तींच्या अन्वये कार्य करीत असून त्यांना कोंडवाड्याकडे नेत असेल किंवा नेण्याच्या बेतात असेल त्या व्यक्तीकडून त्या गुराढोरांना गैरपणे सोडवून घेईल,

त्याला, दंडाधिकाऱ्यासमोर त्याची दोषसिद्धी झाल्यावर, जास्तीत जास्त सहा महिन्यांपर्यंत कारावास किंवा जास्तीत जास्त पाचशे रुपयांपर्यंत द्रव्यदंड किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**गुराढोरांना अतिक्रमण करावयास लावून आगळीक केल्याबद्दल द्रव्यदंड वसूल करणे.**

[2]२५. [3][या नंतरच्या पुढील कलमाखाली बसवलेला किंवा] कोणत्याही जमिनीवर गुराढोरांना अतिक्रमण करावयास लावण्याची आगळीक केल्याच्या अपराधाबद्दल बसवलेला कोणताही द्रव्यदंड ज्या गुराढोरांनी अतिक्रमण केले त्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही गुराढोरांची विक्री करून वसूल करता येईल—मग ती गुरेढोरे अतिक्रमण करताना पकडण्यात आलेली असोत किंवा नसोत व ती अपराधाबद्दल दोषी ठरवलेल्या व्यक्तींच्या मालकीची असोत वा त्यांनी जेव्हा अतिक्रमण केले तेव्हा नुसती तिच्या ताब्यात सोपवलेली असोत.

**डुकरांनी जमीन किंवा पिके किंवा सार्वजनिक रस्ते यांचे नुकसान केल्याबद्दल द्रव्यदंड.**

२६. जर डुकरांच्या मालकाने किंवा राखणदाराने हयगयीने किंवा अन्यथा कोणतीही जमीन किंवा तिच्यावरील कोणतेही पीक किंवा उत्पादन किंवा कोणताही सार्वजनिक रस्ता यावर अशा डुकरांना अतिक्रमण करू देऊन त्याचे नुकसान केले किंवा नुकसान घडवून आणले किंवा नुकसान होऊ दिले तर, त्याला दंडाधिकाऱ्यासमोरील दोषसिद्धीअंती जास्तीत जास्त दहा रुपयांपर्यंत द्रव्यदंड होईल.

---

१. १८९१ चा अधिनियम १, कलम ६ द्वारे मूळ ५ व्या प्रकरणाऐवजी दाखल करण्यात आले.

* भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याची कलमे ६३ ते ७० आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा ५) याचे कलम ३८६ पहा, तसेच सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) याचे कलम २५ ही ताडून पहा.

२. रेल्वेच्या बाबतीत अतिक्रमण करणाऱ्या गुराढोरांच्या प्रकरणी कलम २५ प्रयुक्त करताना भारतीय रेल्वे अधिनियम, १८९० (१८९० चा ९), कलम १२५(२) पहा.

३. १८९१ चा अधिनियम १, कलम ७ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

[1][राज्य शासन वेळोवेळी शासकीय राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून, अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या संबंधात असे निदेशित करू शकेल की, या कलमाचा पूर्वगामी भाग हा जणू काही डुकरांनाच नव्हे तर, सर्वसाधारणपणे गुराढोरांना किंवा अधिसूचनेत वर्णिलेल्या जातीच्या गुराढोरांना अनुलक्षून आहे, किंवा जणू काही "दहा रुपये" या ऐवजी "पन्नास रुपये" हा शब्दप्रयोग त्यात घातलेला आहे, किंवा जणू काही तो याप्रमाणे अनुलक्षूनही आहे आणि तसेच मूळ मजकुराऐवजी असा नवीन मजकूरही घातलेला आहे असे समजून तो भाग वाचावा.]

[2]* * * * * *

कर्तव्ये करण्यात कसूर करणाऱ्या कोंडवाडा रक्षकास दंड.

२७. कलम १९ च्या उपबंधाच्या विरुद्ध जाऊन गुराढोरांची सुटका करणाऱ्या किंवा त्यांची खरेदी किंवा सुपूर्दगी करणाऱ्या, अथवा कोंडवाड्यात टाकलेल्या कोणत्याही गुराढोरांना चारापाणी देण्यात कसूर करणाऱ्या किंवा या अधिनियमान्वये स्वतःला नेमून दिलेली अन्य कोणतीही कर्तव्ये करण्यास चुकणाऱ्या कोणत्याही कोंडवाडा रक्षकाला, तो ज्या अन्य कोणत्याही शिक्षेस पात्र असेल त्याशिवाय आणखी, दंडाधिकाऱ्यासमोर दोषसिद्धी झाल्यास जास्तीत जास्त पन्नास रुपयांपर्यंत द्रव्यदंड होईल.

असे द्रव्यदंड कोंडवाडा रक्षकाच्या वेतनातून वळते करून वसूल करता येतील.

कलम २५, २६ किंवा २७ खाली वसूल केलेल्या द्रव्यदंडाचे उपयोजन.

२८. कलम २५, २६ किंवा २७ खाली वसूल केलेले सर्व द्रव्यदंड हे, दोषसिद्धी करणाऱ्या दंडाधिकाऱ्याची खात्री पटण्याइतपत जी हानी किंवा नुकसानी शाबीत झाली असेल त्याबद्दल भरपाई म्हणून संपूर्णतः किंवा अंशतः विनियोजित करता येतील.

## प्रकरण ७ वे

### भरपाईसाठी दावे

भरपाईसाठी दावा लावण्याच्या अधिकाराची व्यावृत्ती.

२९. गुराढोरांच्या अतिक्रमणामुळे ज्या व्यक्तीच्या पिकांचे किंवा जमिनीच्या अन्य कोणत्याही उत्पादनाचे नुकसान झाले आहे अशा कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही सक्षम न्यायालयात भरपाईसाठी दावा लावण्यास यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे मनाई होत नाही.

वजावट.

३०. दोषसिद्धी करणाऱ्या दंडाधिकाऱ्याच्या आदेशावरून या अधिनियमाखाली अशा व्यक्तीला दिलेल्या भरपाईची रक्कम अशा दाव्यात भरपाई म्हणून तिने मागितलेल्या किंवा तिला देवविण्यात आलेल्या कोणत्याही रकमेतून वजावट करून ती वळती करण्यात येईल.

## [3][प्रकरण ८ वे

### पूरक

विवक्षित कार्याधिकार स्थानिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याचा व जादा जमा रकमा स्थानिक निधीत जमा करण्याचा निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

३१. राज्य शासन वेळोवेळी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे—

(क) जेथे हा अधिनियम प्रवर्तनात आहे अशा आपल्या प्रशासनाखालील राज्यक्षेत्रांच्या कोणत्याही भागातील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडे या अधिनियमाखालील राज्य शासनाचे किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याचे सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही कार्याधिकार त्या स्थानिक प्राधिकरणाच्या स्थानिक अधिकारितेतील स्थानिक क्षेत्रापुरते हस्तांतरित करू शकेल.

[4]* * * * * *]

[अनुसूची.] निरसन अधिनियम, १९३८ (१९३८ चा १) द्वारे निरसित.

---

१. १८९१ चा अधिनियम १, कलम ८ द्वारे समाविष्ट करण्यात आले.
२. १९१४ चा अधिनियम १० द्वारे कलम २६ चा शेवटचा परिच्छेद निरसित करण्यात आला.
३. १८९१ चा अधिनियम १, कलम ९ द्वारे ८ वे प्रकरण जादा दाखल करण्यात आले.
४. खंड (ख) हा, १९१४ चा अधिनियम १० द्वारे अंशतः आणि अनुकलन आदेश १९३७ द्वारे अंशतः निरसित करण्यात आला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.